!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०९ १८/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

**धार्मीक स्थळे वाचवा : शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत आग्रहाची मागणी**

**संभाजीनगर ( दि १८ ) :** न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावून प्रशासन प्राचीन अतीप्राचिन धार्मीक स्थळाला अनाधिकृत ठरवून निष्काशित करत आहे. लोकांच्या धार्मीक भावना भडकून वातावरण खराब करण्याचे काम करीत असल्याचे निदर्शनास आणुन देत शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी धार्मीक स्थळांना वाचवण्याची आग्रही मागणी लोकसभेत केली.

शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी २८ ऑक्टोंबर रोजी बजाजनगरात चार मंदिर व एक चर्च पाडण्यात आल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न या परिसरात निर्माण झाला होता. संभाजीनगर जिल्ह्यात १३८९ मंदिर, चर्च, बौध्दविहार, मशिद, गुरुव्दारा अनाधिकृत ठरवून त्यांना नोटीस बजावण्यात आल्या असल्याने धार्मीक स्थळे तुटणार असल्याची नागरिकांत भितीचे वातावरण असल्याने लोकसभा सभागृहात अनाधिकृत ठरवून त्यांना नोटीसा बजावण्यात आल्या असल्याचे सभागृहात निदर्शनास आणुन दिले. याशिवाय महाराष्ट्रात प्राचीन मंदिरे, गुरुव्दारा यांना ही जिल्हा प्रशासनाने अनाधिकृत असल्याच्या नोटीसा बजावल्या असुन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कुलदैवत एकविरा देवी मंदिर नांदेडचा, यवतमाळ, ठाणे आदि जिल्ह्यातही महत्वाच्या धार्मीक स्थळांना नोटीसा दिल्या गेल्यात धार्मीक भावना दुखावल्या गेल्या आहेत.

प्रशासनाच्या या कारवाया चुकिच्या आहेत. आणि त्यासाठी वापरलेली पध्दतीची पूर्णपणे चुकीची असल्याचे शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभा सभापती सुमित्रा महाजन यांच्या निदर्शनास आणुन दिली. सर्वधर्मीयामध्ये भीतीचे वातावरण असुन या कारवाया झाल्यानंतर कायदा व सुव्यस्थेचा गंभीर प्रश्न उभा राहु शकतो. हिंदूच्या धार्मीक स्थळांवरील प्रशासनाच हल्ला शिवसेना कदापी सहन करणार नाही. या कारवाया थांबवुन धार्मीक स्थळे वाचवण्याची आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत शुन्य प्रहरात केली.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन/ गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525